HOTEL TRIVENI
त्रिवेणी
स्वतंत्र फॅमिली रेस्टॉरंट
लॉजींग (एसी/नॉन एसी)
व्ही.आय.पी.सूटस्
कॉन्फरन्स हॉल
सकाळी १० ते रात्री ११
वाठार-कोडोली रोड, वारणानगर, ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर
फोन (०२३२८)२२३८३९, मोबाईल-९९ ७५ ०६ ३८ ३९
Website : www.trivenihotel.in
E-mail : info@trivenihotel.in

एक निर्भिड गर्जना समाजातील प्रत्येकाची....
प्रत्येकातील माणसाची.....

# वारणेचा वाघ

Kodoli (Kolhapur) • वर्ष १९ • अंक ०८ • २८ जानेवारी २०२० ते ०३ फेब्रुवारी २०२० (साप्ताहिक)• किंमत रु. २/- पृष्ठ संख्या ४ • पान १ • RNI NO. MAHMAR/2003/9554 • Posting Reg.No.KLR-66/2020-2022 • WPP license No. GR/KLP/108/2020-22

## 'म्हणून मी वेगळा मार्ग स्विकारला' मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा भाजपला टोला



मुंबई (प्रतिनिधी) हा विजयी सोहळा होत आहे. त्याचे साक्षीदार आपण आहात. तुमचे अनेक उपकार आहेत. हा माझा सत्कार नाही तर तो आपल्या सगळ्यांचा आहे. मी निमित्त आहे. मी बाळासाहेबांना शब्द दिला होता. त्यामुळे आपले सरकार आले आहे. मी मुख्यमंत्री होईन, असा शब्द दिला नव्हता. माझ्यावर जबाबदारी आली आहे. ही जबाबदारी स्विकारली आहे. वचनपूर्तीच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे. आमच्या त्या मित्राने दिलेले वचन मोडले. बाळासाहेबांच्या मंदिरात वचन दिले ते पाळले नाही. मी खोटे बोलणार नाही, म्हणून मी वेगळा मार्ग स्विकारला. मला खोटं पाडण्याचे प्रयत्न झाले. मात्र, तुमच्या विश्वासाला कधीही तडा दिला जाणार नाही. मी मरण पत्करेन पण खोटे कधीही बोलणार नाही, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

११ ज्येष्ठ शिवसैनिकांच्या हस्ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शिवसैनिकांनी तलवार भेट दिली. यावेळी ठाकरे कुटुंबीय उपस्थित होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि पर्यावरण, पर्यटन आणि राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांचाही सत्कार करण्यात आला. शिवसेनेतील ज्येष्ठ शिवसैनिकांच्या हस्ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. या सत्कारानंतर सगळ्यांना मंचावरुन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अभिवादन केले. या सत्कार सोहळ्याच्या वेळी फटाक्यांची आतषबाजीही करण्यात आली.

यावेळी उद्धव यांनी भाजपला जोरदार टोला लगावला. शिवसेनेचा रंग भगवाच आहे. शिवसेनेचा खरा चेहरा उघड झाला, अशी टीका झाली. मात्र मला आज त्यांना (भाजप) विचारायचे आहे की, तुमचं काय काय उघड झाले? युती तर तुम्ही २०१४ लाच तोडली होती आणि आज आम्हाला नावे ठेवत आहात, असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

पान ४ वर

## मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासाठी पंकजा मुंडे करणार उपोषण

**मुंबई (प्रतिनिधी) भाजपच्या वतीने माजी मंत्री पंकजा मुंडेंच्या नेतृत्वात औरंगाबादेत २७ जानेवारीला सकाळी १० वाजता दुष्काळाशी सामना करत असलेल्या मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्याच्या प्रश्नासाठी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी दिली आहे.**

माजी मुख्यमंत्री व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, विधानसभेचे माजी अध्यक्ष हरिभाऊ बागडे व विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर या उपोषणात सहभागी होणार आहेत. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कोअर कमिटीच्या बैठकीत लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## महाराष्ट्राच्या अथर्व लोहार आणि देवेश भईया ला 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार'



**नवी दिल्ली (प्रतिनिधी) कला व संस्कृती क्षेत्रातील योगदानासाठी अथर्व लोहार तर गणितातील सृजनात्मक कार्यासाठी देवेश भईया या महाराष्ट्रातील दोन बालकांना राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नुकतेच 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. प्रजासत्ताकदिनी होणा-या पथसंचलनात हे बालक सहभागी होणार आहेत.**

केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रपती भवनाच्या दरबार हॉल मध्ये आयोजित कार्यक्रमात 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार २०२०' चे वितरण करण्यात आले. केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री स्मृती ईराणी, राज्यमंत्री देबाश्री चौधरी आणि सचिव रबिंद्र पंवार यावेळी उपस्थित होते. पदक, एक लाख रूपये आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

गेल्यावर्षी पासूनच केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालयाने 'प्रधानमंत्री राष्ट्रीय पुरस्कार' पुरस्कार सुरु केला. सृजनात्मकता, शौर्य, सामाजिक सेवा, क्रीडा, कला व संस्कृती क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणा-या ४९ बालकांना यावेळी 'बाल शक्ती पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. अथर्व लोहार आणि देवेश भईया या महाराष्ट्रातील बालकांनाही यावेळी गौरविण्यात आले. पुरस्कार प्राप्त सर्व बालकांना यावर्षी राजपथावर होणा-या प्रजासत्ताक दिन पथसंचलनात सहभागी होण्याचा बहुमानही मिळणार आहे.

मुळचा सातारा जिल्हयातील फलटन येथील आणि सद्या मुंबईतील अंबरनाथ भागात राहणारा अथर्व लोहार या ११ वर्षाच्या बाल तबला वादकाने कला व सांस्कृतिक क्षेत्रात दिलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. लहानपणापासूनच तबल्याची आवड असणा-या अथर्वने या कला प्रकारात नैपूण्य मिळविले व देशाचे नावही उज्वल केले. थायलंड आणि बँकॉक येथे पार पडलेल्या जागतिक तबलावादन स्पर्धेत अथर्वने भारताचे प्रतिनिधीत्व केले. स्वरसाधना समिती या नामांकीत संस्थेच्या २०१८ मध्ये आयोजित ५३ व्या वार्षीक शास्त्रीय संगीत व नृत्याच्या स्पर्धेत अर्थवने तबला सोलो वादनात सुवर्ण पदक पटकाविले आहे.

पान ४ वर



## संपादकीय

# ईश्वर रुप

त्या ईश्वरास परत जाऊन मिळण्याचे एकुण दोन मार्ग आहेत.एक भक्तीमार्ग व दुसरा ज्ञानमार्ग होय.या दोन्ही मार्गाने तो मानव ईश्वर रुपात समरस होतांना त्या साधकाला जगासंबंधीची साधारण धारणा टाकुन द्यावी लागते.या धारणेच्या निशेःष त्यागानेच मानवमन सर्व वृत्तारहीत होऊन अधिकारी होते.भक्तीमार्गातील सांधक ाने क्षणभंगुरत्व जाणलेले असले तरी जगतकर्त्या निर्मात्यावर त्याचा विश्वास असतो म्हणुन ईश्वराच्या कोणत्या तरी एका रुपावर प्रेम करुन त्याचे ध्यान करत तन्मय होणे व ईश्वराचपर्णबुध्दीने सर्व कर्मे करण्यात त्याचे मन रमते.भक्तीमार्गातील सांधक ईश्वराचे ध्यान करतांना प्रथम त्याची सर्वच मुर्ती आपल्या मनःपशुसमोर आणु शकत नाही कधीच त्याचा हात,कधी पाय,कधी मुख असे एक एक अवयव त्याच्या डोळ्यासमोर येतात ते पण काही क्षणच,लगेच ते नाहीसे होतात.फार वेळ स्थीर रहात नाहीत. अभ्यासाने म्हणजेच चिकाटीने ध्यानसांधना करता करता त्याला जमु लागते,म्हणजेच हळुहळु सार्वांग सुंदर संपुर्ण मुर्तीच्या मनःचक्षुसमोर स्थिर राहु शकते.ध्यान जसजसे अधिकाधिक तन्मयतेने होऊ लागते,तसतसा त्या मुर्तीत त्याला जीवंतपणा दिसु लागतो.ती हसत आहे,बोलत आहे असे दिसुन अखेरीज ती त्या सांधक मानवाला स्पर्शही करते आहे असे दिसते.तेव्हा मात्र तो मुर्ती जिवंत आहे याविषयी त्याला मुळीच शंका रहात नाही.नंतर तर तो सांधक डोळे मिटुन अथवा उघडुन कशाही अवस्थेत त्या मुर्तीचे स्मरण करताच,तो तिला पाहु शकतो.नंतर तर तो असे म्हणु लागतो की,माझी ईष्टदेवता वाटेल ते रुप घेऊ शकते,या विश्वासाच्या बळावर त्याला आपल्या ईष्टमुतीत नाना प्रकारच्या दिव्य रुपांचे दर्शन होते.अशा रितीने जिंवत मुर्तीच्या दर्शनाचा लाभ ज्या सांधकाला झालेला असतो त्याला जागृतावस्थेत दिसणाऱ्या पदार्थाप्रमाणे ध्यानकाली दिसणाऱ्या मुर्तीही तितक्याच सत्य आहेत असा प्रत्यक्ष अनुभव येतो.पण असा सांधक हा त्या ि दव्यमुर्तीचे अवडंबर न करता गोरगरीबांच्या मदतीसाठी प्रयत्न करतो. ईश्वररुपास मिसळुन जाण्याचा दुसरा मार्ग म्हणजे ज्ञानमार्ग होय.या ज्ञानमार्गातील सांधक हा जरी मानवच असला तरी तो या जगात ज्यावेळी जन्म घेतो,त्यावेळी सर्वज्ञ होऊनच अवतरतो.यालाच आपण अवतारी पुरुष म्हणतो.ज्ञानमार्ग सांधनेतील सांधक जर अवतारी पुरुष मानला जातो,म्हणजेच तो प्रत्यक्ष परमेश्वरच असतो.तर मग त्याला दुःख हे कसले माहितच नसणार असे आपण म्हणणार.व हे एका अर्थी बरोबर पण आहे.परंतु परमेश्वर जेव्हा नरदेह धारण करतो तेव्हा त्यास मानव देहाच्या असंपणतेप्रमणे म नाचीही असंपुर्णता स्वीकारली लागते.याचेच उदाहरण द्यावयाचे म्हणजे बावनकशी सोन्याचे नक्षीदार मोहक दागिने जर बनवायचे असतील तर त्यामध्ये इतर धातु मिसळल्याशिवाय ते नीट घडु शकत नाहीत,तसेच प्रत्यक्ष परपेश्वर सुध्दा कोणालाही भेटताना नरदेह घेऊनच भेटतो.त्यावेळी त्याला त्या नरदेहाचे सर्व दोष गुण स्विकारल्याशिवाय या जगात अवतार घेताच येत नाही.ज्ञानमार्गातील सांधक म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच होय.तो ज्यावेळी नरदेह धारण करुन या स्वतःच निर्माण केलेल्या जगात प्रवेश करतो त्यावेळी तो प्रथम सर्वसामान्य मानवाप्रमाणे जीवन जगत असतो.त्याला संपुर्ण विश्वाचे ज्ञान माहित असुनसुध्दा अज्ञानाप्रमाणे वावरत असतो.या जगात अवतरल्यानंतर सुध्दा तो एखाद्या देवतेची मनोभावाने पुजा करुन त्यास प्रसन्न केल्याचे नाटक हुबेहुब वटवतो.याचे कारण एवढेच की,आपण स्वतःनिर्माण केलेले विश्व कालांतराने अंदाधुदी,अनाचार,अत्याचार व मी पणाच्या दांभिकतेने भरलेले असलेमुळे त्याला पुर्वपदावर आणण्यासाठी त्या सत्तांध व अत्याचारी मानवाच्या मनात ईश्वराविषयी भिती निर्माण करुन जनतेच्या मनात ईश्वराविषयी प्रिती निर्माण करणे एवढे महत्वाचे कार्य तो ज्ञानमार्गाने सांधकबरोबर सांधतो.प्रजा दक्ष राजा जसा वेष बदलुन आपल्या नगरीतील लोकांच्या मनातील दुःखे जाणुन घेण्यासाठी राज्यात फेरफटका मारुन नगरवासियांना सुखी ठेवतो तद्वतच कार्य ज्ञानमार्गी सांधक म्हणजेच अवतारी पुरुष करत असतो. ँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारच्या काळात झालेला सिंचनाचा भ्रष्टाचार बाहेर काढू अशी घोषणा करून राज्यात सत्तेवर आलेल्या भाजपने सुमारे दोन वर्षांनी याबाबत कोणता तरी ठाम निर्णय घेतला आणि गैरव्यवहाराम ुळे संशयाच्या भोवऱ्यात अडकलेल्या १४ पाटबंधारे प्रकल्पांच्या ९४ निविदा रद्द केल्या. गेल्या काही काळात भ्रष्टाचारविरोधी विभागामार्फत याबाबत कारवाई सुरू असली तरी छापे टाकणे किंवा तपासणी करणे, यापलीकडे भरीव धोरणात्मक असे काहीच घडत नव्हते, त्यामुळेच सुमारे ६ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकम ेच्या निवीदा रद्द करणे हा महत्त्वाचा निर्णय मानावा लागेल. गेल्या १० वर्षांच्या काळात या विषयावरून जे राजकीय युध्द खेळले जात होते, त्यामध्ये एक म हत्त्वाची चढाई करून भाजपने राष्ट्रवादी काँग्रेसला शह देण्याचा प्रयत्न केला आहे, हाच याचा अर्थ. कारण हा निर्णय काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला विशेषतः माजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी पाटबंधारे मंत्री सुनील तटकरे यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. कारण मुळातच एका सिंचन प्रकल्पातील गैरव्यवहार प्रक जनतेला तेच अपेक्षित आहे.

# सह्याद्रीची घोरपड गिर्यारोहक अरुण सावंत यांचे आकस्मित निधन, त्यांच्या विषयी थोडसं......



सह्याद्रीची घोरपड म्हणून ओळखले जाणारे, गिर्यारोहक अरुण सावंत यांचे वयाच्या साठाव्या वर्षी दुर्दैवी निधन झाले.बातमी वाचून मनाला खूप वाईट वाटले.गिर्यारोहण क्षेत्रातील एक विश्वविख्यात हिरा हरपल्याची भावना अनेकानी व्यक्त केली.

गिर्यारोहक अरुण सावंत आणि त्यांचे तीस सहकारी हरिश्चंद्रगडावर गिर्यारोहणासाठी गेले होते.कोकणकड्याच्या बाजूला असलेल्या माकडनाळ कड्यावर रोहण करत असता, त्यांचा तोल जाऊन ते सुम ारे एक हजारफुट खोल दरीत कोसळले. आणि त्यांचा तेथेच दुर्दैवी अंत झाला.

मुंबई येथील गोरेगाव भागात वास्तव्याला असलेले ,अरुण सावंत हे वयाच्या पंचविसाव्या वर्षापासून गेली पस्तीस वर्षे १९७५ सालापासुन या क्षेत्रात कार्यरत होते.१९८०साली त्यानी थ क चख येथे गिर्यारोहणाचा बेसिक कोर्स पुर्ण केला.आणि जगातील सर्वश्रेष्ठ पर्वत हिम ालय,या हिमालयातील सारी पर्वतराजी त्यानी धुडाळली. गिरीविहार आणि हॉलीडे हायकर्स या गिर्यारोही संघटनेचे ते सदस्य होते.त्यानी हिम ालयातील फ्रेंडशीप,तडाख म नाली,क्षितीधर,सैफी, भागिरथी ही ठिकाणं सर केली होती.पण मायभूमी सह्याद्री पर्वत त्याना गप्प बसून देत नव्हता .सह्याद्री पर्वतातील सारे गडकोट, डोंगर सुळके आणि पाय वाटा की ज्या ठिकाणी आजही एकवीसाव्या शतकात मणुष्य प्राण्याचे पाय लागले नव्हते. त्या डोंगर कपारीला या गिर्यारोहकाचा पाय लागला होता.महाराष्ट्रातील तुंगी,माहुली,भटोबा,तैलबैलाची भिंत,हरिश्चंद्र गड, शैली सुळका, भिवाची काठी असे अनेक गड व डोंगर सुळके यानी पार केले. 'इतच हाय पण दिसत नाही' ह्या म्हणी प्रमाणे मुंबई ,पुणे जुन्या महामार्गावर लोनावळ्या जवळ असलेला ड्युक्स नोज म्हणजेच नागफणीचा सुळका हा कडा, सुळका पादाक्रांत करण्याचा पहिला मान या वीरानं पटकवला.सह्याद्री पर्वतरागेतील जवळजवळ चाळीस एक वाटा त्यानी शोधून काढल्या त्यावर बोल्टींग केले.आज त्याच वाटेवरून आजचे गिर्यारोहक वाटचाल करत मार्गक्रमण करत आहेत.त्यानी शोधलेला कोकण कडा रँपलींग, सांधण व्हॅली,आणि थिटवी वॉटर फॉल, गिर्यारोहक आणि पर्यटकांना आकर्षित करत आहे.खुनावत आहे.

अनेक पुरस्कारानी सन्मानित झालेला ही वीर लोणावळा येथील नागफनीचा सुळका चढून गेल्यावर विशेष प्रसिद्धीच्या झोतात आला. आणि याच वेळी या वीराला 'सह्याद्रीची घोरपड' हा किताब समाजानं दिला.आजही त्यानी शोधलेल्या वाटांवर त्यानी जी बोल्टींग केली आहे.त्या वाटेवरून आज ही नवशिके गिर्यारोहक चढाई करतात.

असा हा वीर आज अनंतात जरी विलीन झाला असला तरी त्यानी घालून दिलेला आदर्श महाराष्ट्रातील गिर्यारोहक आणि गिर्यारोहक प्रेमी विसनार नाहीत. आज ज्या कोकण कड्यावर या वीरानं चिरसमाधी घेतली. त्या कोकण कड्याचा चढाईचा शोध यानीच लावला. तो सर केला.आणि १९८६साली अनंत जनार्दन बर्वे याचा

याच कड्यावरून पडून मृत्यु झाला. त्याला शोधन्याचे आव्हान नातेवाईक आणि प्रशासना पुढे होते.तो काळ वेगळा होता.आजच्या सारखे रँपलींग साहित्य त्यावेळी उपलब्ध नव्हते. इतकेच काय साधी वॉकी टॉकी नव्हती. अशा परिस्थितीत प्रेत शोधायचे होते.ते वरती काढायचे होते. नातेवाइकांच्या हवाली करायचे होते.वरती भयंकर पाऊस कोसळत होता.प्रशासन टप्प झाले होते.आणि प्रेत काढण्याचा एकच आधार उरला होता.तो म्हणजे हायकर्स,आणि शेवटी या वीराला बोलावले.त्यानी ते आव्हान स्विकारले.आणि तशा भर पावसात ते प्रेत शोधून, खांद्यावर घेऊन हा वीर कढा चढून वरती आला.धन्य तो वीर आणि धन्य त्याचा पराक्रम

आज ही महाराष्ट्राची भुमी शिवरायांच्या पदस्पर्शानं पावण झाली आहे. या भुमीत त्या काळात ही हे गिर्यारोहक होते.आणि म्हणून तर आम ावशेच्या रात्री काळ्याकुट्ट अंधारात तानाजी कोंडाना चढला.बाजीप्रभू घोडखिंडीत सिध्दीला नडला. मुरारबाजी म ध्यानराती पुरंदर उतरला.आणि माझा शिवबा राजा एकोनीस दिवसात प्रवास करुनआग्रा ते रायगड

पोहचला.हे कशाचं प्रतीक हे ही गिर्यारोहकच होते.आणि तीच परंपरा आज हे वीर संभाळत आहेत.आज अरुण सावंत गेले नाहीत तर गिर्यारोहणात आज ते शहिद झाले. या महाराष्ट्राच्या भुमित म्हणतात वेळ आल्यावर गवताला भाले फ ुटतात.तसे अरुणरूपी भाले या क्षेत्रात जन्माला येतील.आणि या वीराची राहीलेले कार्य पुर्ण करतील.वाचक हो मी गेले तीन वर्ष ह्या क्षेत्राशी संबधीत आहे. मी अरुण सावंताना पाहिलं नाही. पण त्यांचं कार्य आमचे गिर्यारोही मित्र नेहमी सांगायचे. कधीतरी भेट होइल ही आशा होती. पण ती अधुरी राहीली. असो आज गिर्यारोहण हे क्षेत्र फक्त गड, सुळके ,शिखरे यांची चढाई म्हुणून शिल्लक राहीले नाही .तर आज आपण दररोज वर्तमान पत्रातून वाचतो.आज अमूक माणूस डोंगरावरुन पडला. दुसरा दरीत घसरला.किंवा गाडी दरीत कोसळली अशा अनेक घटना ज्या वेळी घडतात. त्या वेळी या वीरांची आठवण येते. दोन वर्षापुर्वी अंबेनळी घाटात घडलेली घटना आज ही ताजी आहे.गाडी खोल दरीत कोसळली होती.तीस जनाना समाधी मिळाली होती.आणि ती प्रेते काढण्याचं काम सुमारे दोन दिवस अपारकष्ट करून वरती काढली.ते काम महाबळेश्वर येथील या गिर्यारोहकानीचं केले. आणि म्हणून मला या क्षेत्राचा अभिमान वाटतो.आज अरुण सावंताच्या जाण्यानं जी पोकळी निर्माण झालेय ती भरून येणं शक्यच नाही. पण एक मात्र नक्कीच ऐसा वीर परत होणे नाही.परत एकदा, या वीराला भावपूर्ण श्रद्धांजली

**बळवंत पाडळे**
संचालक
शिवरक्षक लाईफ लाईन
रेस्क्युअसोशिएन
सौजन्य
सवेंदना सेवा फाउंडेशन

# जिजाऊंचा विचार जोपासल्यास शिवाजी महाराज समजतील- शिवचरित्रकार एन.के.पाटील



**कोडोली (प्रतिनिधी) जिजाऊंचा विचार प्रत्येक कुंटुंबाने जोपासल्यास नवीन पिढीला शिवाजी महाराज समजतील. यासाठी घरात शिवचरित्राचे पारायण व्हायला हवे. असे आवाहन शिवचरीत्रकार एन.के.पाटील यांनी चावरे (ता.हातकणंगले) येथे केले.**

येथील चावराई माध्यमिक विद्यालयात चावराई हस्तलिखित प्रकाशन,हळदीकुंकू, पारीतोषिक वितरण व सांस्कृतिक सोहळा उत्साहात झाला. यावेळी श्री. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी सुराज्य फौंडेशनचे समन्वयक व्ही.पी.कांबळे होते.

विद्यार्थीनींनी स्वागतगीत सादर केले.मुख्याध्यापक संजय पाटील यांनी शाळेतील उपक्रम ांचा आढावा घेतला.

के.एन.पाटील यांनी शिवचरीत्र, सामाजिक कार्यकर्त्या प्राजक्ता चव्हाण यांनी महिलांचे अस्तित्व याविषयी, तसेच किणी हायस्कूल चे अध्यापक व्ही.बी. कुंभार, साक्षी पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

उपस्थितांच्या हस्ते बँक ऑफ इंडिया बँकेत निवड झालेबद्दल माजी विद्यार्थ्यांनी नम्रता मानसिंग निकम, विशेष सहकार्याबद्दल ओंकार पाटील यांना सन्मानित करण्यात आले.

आदर्श खेळाडू अजिंक्य पाटील सह विविध स्पर्धेतील खेळाडूना पारीतोषिक देण्यात आली.

महिलांच्या स्पर्धेतील विजेत्या- सारीका निकम, रंजना लोहार, अनिता गायकवाड तसेच लकी ड्रॉ विजेत्या-अर्चना चव्हाण, शितल निकम,अनिता पवार यांना भेटवस्तू देण्यात आल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थी,विद्यार्थ्यांनींनी देशभक्तीपर, सामाजिक विषयावर गीते,नाटीका, नृत्ये सादर केली.

यावेळी हातकणंगले खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील, वारणा बँकेचे माजी संचालक माणिकराव निकम, ग्रामपंचायत सदस्य विकास निकम, दिंगबर गायकवाड, सदस्या आशाराणी धनवडे, शालेय समितीचे अध्यक्ष जगदीश पाटील, संभाजी पाटील,अम रसिंह पाटील, काकासाहेब पाटील, जयकर पाटील, श्रीकांत धनवडे, दिपकराव शिंदे, सुरेश पाटील,रमेश गुरव, प्रकाश पाटील, मानसिंग पाटील,ओंकार पाटील भानुदास काशिद, एकनाथ धनवडे उपस्थित होते. ए.व्ही.वळगड्डे, सी.एस. पाटील, एस.एन.पाटील, ए.वाय.पाटील, एन.एस. कुंभार, डी.ए.पाटील यांनी परीश्रम घेतले. एस. एस.जाधव यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. जे.बी. बिडकर यांनी सूत्रसंचालन केले. ए.व्ही. वळगड्डे यांनी आभार मानले.

# फडणवीस सरकारकडून शिवसेना, काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेत्यांचे फोन टॅप; चौकशीचे आदेश

**मुंबई (प्रतिनिधी) विधानसभा निवडणुकीच्या काळात फडणवीस सरकारने काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना नेत्यांचे फोन टॅप केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. याप्रकरणी राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.**

तत्कालीन भाजप सरकारच्या हातात असलेल्या सरकारी यंत्रणेचा वापर करून काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना नेत्यांचं फोनवरचं संभाषण ऐकण्यात आले, असा आरोप आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्र सरकारचे काही अधिकारी इस्त्रायलला गेले होते. त्यांनी तिथून आणलेल्या सॉफ्टवेअरचा वापर करून विरोधकांचे फोन टॅप केल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल, असे अनिल देशमुख यांनी सांगितले.

तसेच कोरेगाव-भीमा प्रकरणाचीही नव्याने चौकशी करण्याचे संकेत अनिल देशमुख यांनी दिले. कोरेगाव-भीमा प्रकरणाकडे संशयाने पाहिले जात आहे. आमच्याकडे अशाप्रकारची अनेक निवेदने आली आहेत. भाजप विरोधात कुणीही विचार मांडले तर त्याला अर्बन नक्सल म्हणायचे, अशी फडणवीस सरकारची भूमिका होती. त्यामुळे या सगळ्याची योग्य पद्धतीने चौकशी झाली पाहिजे. यासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) नेमणूक करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याची माहितीही यावेळी देशमुख यांनी दिली.

# ही खुर्ची तुमचीच आहे..



**मुंबई (प्रतिनिधी) प्रशासनातील प्रत्येक व्यक्ती मग ती कोणत्याही पदावर असो, त्याला योग्य सन्मान आणि आदर दाखविणाऱ्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या एका कृतीची सांगली भागात चर्चा आहे. निमित्त होतं इस्लामपूरमधल्या वाळवा तहसील कार्यालयाच्या नव्या, देखण्या वास्तूच्या उद्घाटनाचे !**

मुख्यमंत्री दोन दिवसांपूर्वी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावरआले होते. इस्लाम पूरमधील वाळवा तहसील कार्यालयाच्या एका सुंदर इम ारतीचे त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार होते.स्वातंत्र्य लढ्यात ज्या गावातील प्रत्येक घराणे आपले योगदान दिले असे हे वाळवा. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आंदोलनकर्त्यांचे हक्काचे ठिकाण असलेल्या कचेरीच्या परिसरातच उभारण्यात आलेली ही इमारत म्हणजे नव्या युगातील प्रशासनाचे प्रतीक ठरावी अशीच आहे. तर अशा या इमारतीच्या उद्घाटनाला मुख्यमंत्र्यांचे सायंकाळी आगमन झाले.

उद्घाटन झाल्यावर लगेच होणाऱ्या जाहीर सभेसाठी लोकांची गर्दी झाली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे पालकमंत्री जयंत पाटील तसेच इतर मंत्री व राज्यमंत्री यांच्यासमवेत आगमन झाले आणि लगोलग हे सर्व जण तहसील कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या दाराजवळ गेले. फीत वगैरे कापून मग रितीप्रमाणे मुख्यमंत्री व सर्व मान्यवर या इमारतीतील दालनांची पाहणी करू लागले. वरच्या मजल्यावरच बैठक सभागृह पाहून मुख्यमंत्री सर्वात शेवटी खालच्या मजल्यावरील तहसीलदारांच्या दालनापाशी आले. इमारतीतील हे प्रमुख कार्यालयच असल्याने स्वाभाविकच आतमध्ये येऊन त्यांनी कार्यालयाची रचना पाहायला सुरुवात केली.

समोर तहसीलदारांची खुर्ची होतीच. त्यात थोडसं बसून अचानक ते उठले आणि थोड्या दूरवर उभ्या असलेल्या तहसीलदार रवींद्र सबनीस यांच्या हाताला पकडून खुर्चीपाशी आणले आणि काही कळायच्या आत त्यांना फर्मावले तुम्ही तहसीलदार ना? मग ही खुर्ची तुमची आहे...बसा इथे खुद्द मुख्यमंत्री प्रेमळ शब्दांत आदेश देत आहेत, तिथे जिल्हाधिकारी अभिजित चौधरी, मंत्री, राज्यमंत्री उपस्थित आहेत त्यामुळे साहजिकच गांगरलेल्या सबनीस यांनी मुख्यमंत्र्यांना नम्रपणे मी बसू शकत नाही असे सांगितले. पण मुख्यमंत्र्यांनी ठरवलेच होते. ही तुमची इमारत आहे, याठिकाणी तुम्ही प्रमुख म्हणून काम पाहणार आहात,ही तुमची खुर्ची आहे. या खुर्चीवर माझ्या हस्ते तुम्हाला स्थानापन्न करायचे आहेअसे मुख्यमंत्र्यांनी आग्रहाने सांगितल्यावरमग सबनीस यांचा नाईलाज झालं आणि ते त्या खुर्चीवर बसले. या महत्वाच्या पदावर तुम्ही आहात. तुम्हाला मी स्वत: बसवले आहे त्यामुळे काम पण चोखपणेच करा असे सांगून मुख्यमंत्र्यांनी सबनीस यांची पाठ थोपटली.

या इमारतीच्या बाहेर एक फार जुने कडूनिंबाचे झाड होते. या झाडाला वाळव्यातील नागरिक स्वातंत्र्यसंग्रामाचा साक्षीदार मानत, त्याला त्यांनी तोडूही दिले नव्हते मात्र नंतर त्याचे दुसरीकडे पुनर्रोपण करण्यात आले. मुख्यमंत्र्यांना या झाडाविषयी अगोदरच माहिती देण्यात आली होती. त्या झाडाच्या जागेपाशी काही काळ थांबून मुख्यमंत्री सोबतच्या अधिकारी–कर्मचार्यांच्या लवाजम्याला म्हणाले कडूनिंबाच्या या झाडाप्रमाणे वागा, खूप सावली द्या, आणि या झाडासारखे प्रेम मिळवा. सर्वात महत्वाचे म्हणजे तुमच्याकडे येणाऱ्या लोकांना समजावून घ्या

मुख्यमंत्री उद्घाटन करून तिथून निघूनही गेले, पण तेव्हापासून मी जेव्हा जेव्हा या नवीन दालनातल्या माझ्या खुर्चीवर बसतो,मला शेजारी राज्याचे मुख्यमंत्री खुद्द उभे आहेत असा भास होतोरवींद्र सबनीस सांगत होते. मुख्यमंत्र्यांचा विनयशीलपणा आणि दिलेल्या योग्य सन्म ानामुळे केवळ तहसीलदार सबनीसच नव्हे तर तेथील सर्वच कर्मचाऱ्यांना आपली जबाबदारी अधिकच वाढली आहे याची जाणीव झाली.

# सभासदांनी जास्तीत जास्त ऊस वारणेला पाठवावा – आ. विनय कोरे

## डिसेंबर अखेरची बिले शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा



कोडोली (प्रतिनिधी) वारणानगर येथील तात्यासाहेब कोरे वारणा साखर कारखान्याने गत गळीत हंगामातील एफआरपी ऊस बिलासह तोडणी वाहतुकीची देणी पूर्णपणे भागवून चालू हंगामातील तुटलेल्या उस बिलाची एफ आर पी प्रतिटनस २८०० रुपयाप्रमाणे होणारी रक्कम ३१ डिसेंबर २०१९ अखेर संबंधित ऊस उत्पादकांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली असून गाळपाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी ऊस उत्पादक **सभासदांनी जास्तीत जास्त ऊस वारणा कारखान्यास पाठवून सहकार्य करावे असे आवाहन वारणा समूहाचे नेते आम. विनय कोरे यांनी केले आहे.**

आम.विनय कोरे म्हणाले श्री .तात्यासाहेब कोरे वारणा साखर कारखान्याने अनेक संकटावर मात करीत तांत्रिक दृष्ट्या अत्यंत चांगले गाळप पूर्ण करून सरासरी साखर उतारा १२.१० इतका साध्य केला आहे.आज कोल्हापूर जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा सरासरी साखर उतारा पाहता वारणा कारखाना साखर उताऱ्यात निश्चितच कोल्हापूर जिल्ह्यात अग्रेसर ठरलेला आहे. कारखान्याचा उसाच्या रसापासून थेट इथेनॉल निर्मिती सुरु आहे. त्याचीही तांत्रिक कार्यक्षमता अतिशय उत्तम आहे.तसेच ४४ मेगावॅट वीजनिर्मिती प्रकल्प देखील पंधरा दिवसात कारखाना व्यवस्थापनाकडे वर्ग होणार असल्यामुळे कारखान्याच्या उत्पनात भरीव वाढ होणार आहे.

कारखान्याच्या यशस्वी वाटचालीसाठी अध्यक्षा शोभाताई कोरे, उपाध्यक्ष प्रतापराव पाटील ,सर्व संचालक मंडळ आणि कामगार वर्ग यांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केल्याने कारखान्याच्या आर्थिक व तांत्रिक परिस्थितीम ध्ये सुधारणा होत असल्याचे आम. विनय कोरे यांनी सांगितले.

# कडकनाथ घोटाळ्यातील पहिला बळी

## माले येथील अविवाहीत तरूण शेतकऱ्याची कर्जाला कंटाळून आत्महत्या

**कोडोली (प्रतिनिधी) राज्यातील हजारो शेतकऱ्यांची करोडो रुपयांची फसवणुक झालेल्या कडकनाथ कुकुटपालन घोटाळ्यातील माले ता. पन्हाळा येथील पिडीत अविवाहीत तरूण शेतकऱ्याने आत्महत्या केल्याने सगळीकडे खळबळ उडाली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हा पहिला बळी असून प्रमोद सर्जेराव जम दाडे वय २९ याने आत्महत्या केली आहे.**

हजारो कुटुंबांना देशोधडीला लावणा–या कडकनाथ कोंबडी घोटाळ्याच्या तपासाचे पुढे काय झाले याची कुणालाच कल्पना नसली तरी, या घोटाळ्यामुळे एक शेतकरी कुटुंब उघड्यावर पडले आहे. प्रमोद याने कडकनाथ कोंबडी व्यवसायासाठी लाखो रुपये कर्ज आणि सावकारी कर्ज स्वरूपात काढलेले होते. या व्यवसायात चांगला परतावा मिळेल अशी आशा दाखवून मोठी फसवणूक झाल्याने काढलेले कर्ज कशाने परत करायचे हा मोठा त्याच्या पुढे प्रश्न होता. या आर्थिक धक्क्यातून सावरण्यासाठी त्याने शेळी पालन व्यवसायही सुरू केला होता.



मात्र कडकनाथ कोंबडी व्यवसायासाठी काढलेल्या कर्जाचे मोठे हप्ते परत जाणे अशक्य झाले होते. खासगी सावकार आणि वित्तीय संस्थांच्या तगाद्याला तो कंटाळला होता. त्यामुळे त्याने चार दिवसापूर्वी विषारी औषध प्राशन केले होते. गेली ४ दिवस मृत्यूशी झुंज देत मंगळवारी सकाळी त्याचा मृत्यू झाला.

कडकनाथ कोंबडी व्यवसायात हजारो शेकडो कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे. यामध्ये पन्हाळा–शाहुवाडी तसेच वारणा परिसरातील बेरोजगार तरुणांची देखील फसवणूक मोठी फसवणुक झाली आहे. कर्जाचे प्रमाण इतके होते की त्यातून सावरणे अनेकांना शक्य झालेले नाही. प्रमोद जमदाडे हा त्यापैकीच एक तरुण आहे.

यासंदर्भात कोडोली पोलीसात प्रमोद जमदाडे सह परिसरातील तरुण शेतकऱ्यांनी फसवणूक केलेल्या संबंधित कंपनीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. फसवणुक झालेल्या तरुणांनी स्थानिक पोलिस ठाण्यात दाखल केलेले गुन्हे आर्थिक गुन्हे अन्वेषन शाखेकडे वर्ग करण्यात आले आहेत. दाखल गुन्ह्याला राजकीय वरदहस्तामुळे तपासाला पुढे गतीच मिळत नसल्याने फसवणूक झालेले तरूण सैरभैर झाले आहेत. पोलीसाकडून कारवाईच ठोस होत नसल्याने गुंतवणूकदार हतबल झाले आहेत त्यामुळे कडकनाथ आणखी किती बळी घेणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रमोद जमदाडे याच्या पाश्चात आई, वडील, भाऊ, असा परिवार आहे. तो जय भवानी पाणीपूरवठा संस्थेचे चेअरमन सचिन जमदाडे यांचा पूतण्या होत.

तो मनमिळावू स्वभावाचा असल्याने त्याच्या जाण्याने जमदाडे परिवारावर शोककळा पसरली असून माले सह परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# ‘नाईट लाईफमध्ये बार, क्लब अन् मद्य दुकानांना परवानगी नाही’



**मुंबई (प्रतिनिधी) गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या नाइटलाइफच्या निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता येत्या २७ जानेवारीपासून मुंबईत नाइटलाइफ प्रत्यक्षात लागू होणार आहे. मात्र, राज्य सरकारच्या या नाइट लाइफच्या निर्णयाला भाजपाने विरोध दर्शविला आहे. भाजपाच्या या विरोधानंतर कामगारमंत्री नवाब मलिक यांनी विरोधकांनी अगोदर अभ्यास करावा, असे म्हणत भाजपा नेत्यांना टोला लगावला आहे.**

नाइटलाइफ नाही तर किलिंग लाइफ असल्याचे सांगत भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी राज्य सरकारवर हल्लाबोल केला. ही नाइटलाइफ नसून किलिंग लाइफ आहे. म ुंबईतील कमला मिल येथे आग लागली होती. त्यामध्ये १४ जणांचा मृत्यू झाला. मुंबईच्या नाइटलाइफला रक्तरंजित इतिहास आहे, हे निर्णय घेणाऱ्यांना माहिती नाही का?’ असा सवाल आशिष शेलार यांनी केला होता. त्यानंतर, नवाब मलिक यांनी नाईट लाईफबद्दल महत्त्वाची माहिती दिली.

मुंबईतील २४/७ नाईट लाईफचा जो प्रस्ताव आहे, त्यात फक्त हॉटेल्स, दुकाने, मॉल्स यांनाच पूर्णवेळ सुरू ठेवण्याची परवानगी असणार आहे. बार, क्लब किंवा मद्य दुकाने यांना परवानगी नसणार आहे. या निर्णयामुळे जिथे सन्नाटा असतो, अशा ठिकाणी होणाऱ्या गुन्हेगारीला आळा बसेल. निर्णयामुळे लोकांना सुविधा मिळणार असून मुंबईतील ट्रॅफिकही कमी होईल, असे कामगारमंत्री नवाब मलिक यांनी म्हटलंय. तसेच, या निर्णयामुळे रोजगारनिर्मित्ती होणार असून सरकारचा महसूलही वाढीस लागेल. त्यामुळे, विरोधकांनी विरोध करण्यापूर्वी प्रस्तावात देण्यात आलेल्या बाबींचा पूर्ण ’अभ्यास’ करावा, असा टोलाही मलिक यांनी लगावला.

दरम्यान, मुंबईत नाइटलाइफला राज्य सरकारकडून तत्वत: मंजुरी देण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी याबाबतची घोषणा केली आहे. ’पब आणि बारसाठी नवे नियम करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे पब आणि बार हे आधीप्रमाणेच रात्री दीड वाजेपर्यंतच सुरू राहतील,’ असे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरेंनी स्पष्ट केले आहे.

# भ्रष्ट देशांच्या यादीत भारत ८० व्या स्थानावर



**मुंबई (प्रतिनिधी) जगातील भ्रष्ट देशांची यादी जाहीर करण्यात आली असून, १८० देशांच्या या यादीत भारत ८० व्या स्थानावर आहे. भारताची दोन स्थानांनी घसरण झाली आहे. २०१८ मध्ये भारत या यादीत ७८ व्या स्थानावर होता. यावरून भारतातील भ्रष्टाचार वाढल्याचे समोर येत आहे. भ्रष्टाचार मुल्यांकन निर्दे शांक २०१९ (** Corruption Perception Index **२०१९) ची ही यादी भ्रष्टाचाराचा अभ्यास करणारी संस्था ट्रांसपरेंसी इंटरनॅशनलने केली आहे.**

या यादीत भारत ४१ गुणांसह ८० व्या स्थानावर आहे. भारतासह चीन, घाना, बेनिन आणि मोरक्को यांचे देखील ४१ गुण आहेत. मात्र शेजारील देशांपेक्षा भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारताची स्थिती चांगली आहे. पाकिस्तान या यादीत तीन स्थानांनी घसरूण १२० व्या स्थानावर पोहचला आहे. श्रीलंका ९३, नेपाळ ११३ आणि बांगलादेश १४६ व्या स्थानावर आहे.

जागतिक भ्रष्टाचार म ुल्यांकन निर्देशांकानुसार दोन तृतियांश देशांचे गुण ५० पेक्षा कमी आहेत व त्यांची सरासरी ४३ आहे. २०१२ पासून आतापर्यंत केवळ २२ देशांमधील भ्रष्टाचार कमी झाला आहे. ज्या देशांमधील भ्रष्टाचार गेल्या काही वर्षात कमी झाला आहे त्यामध्ये ऑस्ट्रेलिया, कॅनडा, निकारागुहा, फ्रान्स, ब्रिटन आणि अमेरिकेचा सम ावेश आहे.

या निर्देशांकानुसार, डेनमार्क आणि न्यूझीलँडमध्ये भ्रष्टाचार सर्वात कमी आहे. तर सर्वाधिक भ्रष्टाचार सोमालिया, सूडान, सीरिया या देशांमध्ये होत आहे.

# माहिती व जनसंपर्कच्या महासंचालकपदी डॉ. दिलीप पांढरपट्टे रुजू

**मुंबई (प्रतिनिधी)माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे सचिव आणि महासंचालक म्हणून डॉ.दिलीप पांढरपट्टे (भा.प्र.से.) यांनी नुकताच पदभार स्वीकारला.**

श्री. पांढरपट्टे यांची १९८७ मध्ये उपजिल्हाधिकारी या पदावर निवड झाली. २००० मध्ये अपर जिल्हाधिकारी म्हणून त्यांना पदोन्नती मिळाली. २७ मार्च २०१५ साली त्यांची भारतीय प्रशासन सेवेत नियुक्ती करण्यात येऊन त्यांचा समावेश २००४ च्या बॅचमध्ये करण्यात आला.

श्री. पांढरपट्टे यांनी १९८१ मध्ये बी.एस्सी.,१९८३ मध्ये बी.एड्.,२००५ मध्ये एल.एल.बी.,२००८ मध्ये एल.एल.एम.,२०१४ मध्ये एम.बी.ए. आणि २०१७ मध्ये पीएच.डी याप्रमाणे पदव्या प्राप्त केल्या आहेत.

श्री. पांढरपट्टे यांचे वेगवेगळ्या पदावर काम

डॉ.दिलीप पांढरपट्टे यांनी १९८९–उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी (सिंधुदुर्ग),१९८९–९१ – उपविभागीय अधिकारी,दापोली (रत्नागिरी), १९९१–९२ –जिल्हा पुनर्वसन अधिकारी, रायगड,१९९२–९६– उपविभागीय अधिकारी, माणगांव, रायगड, १९९६–९७ – सहाय्यक आयुक्त मागासवर्ग कक्ष (कोकण विभाग), १९९७–२०००– निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड,२०००–२००१ – प्रादेशिक विशेष अधिकारी, विभागीय चौकशी (कोकण विभाग), २००१–२००४ – उपायुक्त, ठाणे महानगरपालिका, २००४–२००५– उपसचिव (सांस्कृतिक कार्य विभाग), २००५–२००६–उपायुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, २००८–२०११ – अपर जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, २०११–२०१३ – अध्यक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती (कोकण विभाग/ रत्नागिरी), २०१३–२०१५– मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, २०१५–ऑगस्ट २०१६ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, ११ ऑगस्ट २०१६ ते २० एप्रिल, २०१८ जिल्हाधिकारी, धुळे, ०७ मे, २०१८ पासून जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग म्हणून २० जानेवारी 2020 पर्यंत ते कार्यरत होते.



**वाययीन कामगिरी :**

प्रशासकीय सेवा बजावताना श्री. पांढरपट्टे यांनी आपल्या वाययीन व साहित्यिक सर्जनशीलतेला कायम फुलवीत ठेवले. त्यांची साहित्यसंपदा पुढीलप्रमाणे आहे. 'घर वाऱ्याचे, पाय पाऱ्याचे' (ललित लेखसंग्रह तीन पुरस्कार)'कथा नसलेल्या कथा' (कथासंग्रह) 'बच्चा लोग ताली बजाव' (विनोदी लेखसंग्रह) 'शायरी नुसतीच नाही' (उर्दू शायर आणि शायरीचा परिचय) 'शब्द झाले सप्तरंगी' (मराठी गजल संग्रह) चार आवृत्यासव्वाशे बोधकथा भाग–१ (बोधकथा संग्रह) दोन आवृत्यासव्वाशे बोधकथा भाग–२ (बोधकथा संग्रह)डॉ.राम पंडित संपादित'मराठी गजल'राहील त्याचे घर' (कुळकायद्यातील घरठाण हक्काबाबत)

**साहित्यिक उपक्रम :**

गजल तसेच अन्य विषयांवरील व्याख्यानांचे महाराष्ट्रभर व राज्याबाहेर अनेक कार्यक्रम.गजल/ गीतांच्या सी.डी. प्रकाशित (मराठी व उर्दू).दैनिक सकाळ (मुंबई) मध्ये बोधकथा या सदरातून पाचशे बोधकथा प्रसिद्ध. आकाशवाणी /दूरदर्शन मधून कविता व गद्य लेखन. उर्दू भाषा व लिपी शिकून उर्दू मध्ये'रिंद'या नावाने गजल लेखन.'शब्द झाले सप्तरंगी'व'गजल– रेगिस्तान से हिंदुस्तान तक'तसेच'गालिब और मैं'या कार्यक्रमांतून गजल सादरीकरण.

# शरद पवारांच्या दिल्लीतील निवासस्थानाची सुरक्षा हटवली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) दिल्लीतील राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्या निवासस्थानी असलेली सुरक्षा हटवण्यात आली असून शरद पवार यांच्यासोबतच ४० जणांची सुरक्षा हटवण्यात आली आहे. सुरक्षा रक्षक २० जानेवारी पासून काढले आहे. केंद्रीय गृहखात्याने सुरक्षा रक्षक कमी करण्याबाबत अधिकृत माहिती दिलेली नाही.**



झेड सिक्युरिटी शरद पवार यांना राज्यात आहे. तीन गार्ड शरद पवार यांच्या दिल्लीतील घरी सहा जनपथला होते. जे शिफ्ट मध्ये काम करत होते आणि एक पीएसओ हा देखील होता. पण हे सुरक्षा रक्षक २० तारखेपासून काढण्यात आले आहेत. हे सुरक्षा रक्षक ड्युटीवर आलेले नाही. तेव्हा सुरक्षा कमी करण्यात आल्याचे लक्षात आले. सुरक्षा रक्षक कमी करण्याबाबत अधिकृत काहीच केंद्रीय गृहखात्याने कळवले नाही. राज्यात सत्ता बदल झाल्यानंतर शरद पवार यांची दिल्लीतील सुरक्षा हटवली? असा चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने काही दिवसांपूर्वी सुरक्षा व्यवस्थेमधील कपातीबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. एक्स दर्जाची सुरक्षा सचिन तेंडुलकरला पुरवण्यात येत होती. पण एखाद्या व्यक्तीला दिली जाणारी सुरक्षा कायम स्वरुपाची नसते. वेळोवेळी त्याचा आढावा घेऊन सुरक्षेची श्रेणी बदलण्याचा अधिकार राज्य पोलिस प्रशासनाकडे असतो. त्यानुसार सचिनच्या सुरक्षेत कपात करण्यात आली होती. मात्र ही सुरक्षा कायम ठेवावी, अशी विनंती सचिन तेंडुलकरने मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

# शब्द सामर्थ्यामुळे शंभर वर्षानंतरही आणाभाऊंचे विचार समाजासाठी आदर्शवत – आम. डॉ. विनय कोरे



**पन्हाळा( प्रतिनिधी )शब्द सामर्थ्यामुळे शंभर वर्षानंतरही आण्णा भाऊंचे विचार समाजासाठी आजही आदर्शवत आहेत असे प्रतिपादन आम.डॉ. विनय कोरे यांनी केले जेऊर ता. पन्हाळा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित ३५ व्या पश्चिम महाराष्ट्र शाहीर महोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.**

वस्त्रोद्योग मंडळाचे उपाध्यक्ष कर्णसिह गायकवाड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.जेऊर सत्कार्य व संवर्धन मंडळाचे कार्याध्यक्ष सुभाष माने यांनी स्वागत केले

यावेळी कोल्हापूर,सांगली,सातारा जिल्ह्यातील अनेक नामवंत शाहीरांचा मानाचा प.पु.सद्गुरू चिले महाराज पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

आम.श्री. कोरे म्हणाले, राज्यभर अण्णाभाऊंची जन्मशताब्दी निमित्त विविध कार्यक्रमाने जन्मशताब्दी वर्ष साजरी होत असताना जेऊर ग्रामस्थानी अण्णाभाऊंच्या स्वप्नातील लोककला जतन करणाऱ्या शाहिरांचा सन्मान करत राज्यात एक वेगळा आदर्श घालून दिला आहे याची प्रेरणा घेऊन उद्याच्या काळात या कलेकडे नवयुवकांचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलेल

यावेळी आम.विनय कोरे यांच्यासह प्रमुख मान्यवरांचा अण्णाभाऊंची पुस्तके भेट देऊन सन्मान करण्यात आला .

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन सुरभीचे प्रमुख प्राध्यापक आनंद गिरी व कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष भिमराव पाटील यांनी केले याप्रसंगी वस्त्रोद्योग मंडळाचे उपाध्यक्ष कर्णसिंह गायकवाड, माजी सभापती अनिल कंदूरकर, शाहूवाडीचे माजी उपसभापती महादेवराव पाटील साळशीकर ,जेऊर सरपंच प्रियांका महाडीक, विजयसिंह पाटील अभयसिंग नलवडे, मारुती पाटील, दत्ता पाटील, बाबुराव पाटी,ल महिपती पाटील,

> अण्णाभाऊंना जातीपातीत न अडकवता त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन नवा महाराष्ट्र घडवण्यासाठी सर्वांची सामूहिक प्रयत्न सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावा असे विनय कोरे यांनी सागितले

कोल्हापूर शाहिर परिषदेचे अध्यक्ष शामराव खडके, शिवशाहीर राजू राऊत ,उत्तम महाडिक,दत्ता बोबडे, याच्यासह सर्व पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते .

यावेळी सुमारे शंभरावर शाहिरांचा मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, स्वागत उत्तम कंदूरकर यांनी केले तर आभार उपसरपंच धोंडीराम पाटील यांनी मानले .या उत्सवात उपस्थित शाहिरांनी राष्ट्रीय पोवाडा,कवने,गोंधळ भेदिक कलगीतुरा आधी लोककला सादर करून उपस्थित रसिकांची मने जिंकली

**या शहिराचा झाला सन्मान**

शाहीर विठ्ठल टिपुगडे,रामचंद्र जाधव,दत्तात्रय चूयेकर,बंडा भोसले,बदाम ढेंगे, एकनाथ पाटील,शिवाजी वरेकर,नेताजी सावंत,विश्वास पाटील,,बाळासाहेब पाटील हरिभाऊ घोंगडे,सर्जेराव संगपाळ,समशेर पाटील,अजित आयरेकर,राजू पाटील,निवृत्ती कुंभार,आलम बागणीकर,

**महाराष्ट्र शासन**

**वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण, कागल,**

**बी–१ निविदा सुचना क्र. ३/सन २०१९–२०**

वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण, कागल यांचे वतीने खालील कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर व जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता, मजुर संस्था व खुला प्रवर्ग कंत्राटदाराकडून खालील कामासाठी बी–१ निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचे नाव– :** सामाजिक वनीकरण परिक्षेत्र कागल स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान कागल ता. कागल जि. कोल्हापूर येथे करावयाची कामे.

| अ. क्र. | परिक्षेत्र | तालुका | कामाचे ठिकाण | कामाचा प्रकार | अंदाजपत्रकीय रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कागल | कागल | कागल | स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान कागल येथे प्लबिंग, वॉश बेशिंग व पाण्याची टाकी बसविणे. | ५४३६७२/– | ३० दिवस |
| २ | | | | वनतळे क्र. ०१ वरील ४ व धबधब्या जवळील पॅगोड्यात पीसीसी करणे | ४८३७३/– | ३० दिवस |
| ३ | | | | जवळील १ व नक्षत्र वनातील १ अशा २ पॅगोड्यात पीसीसी करणे. | ५०३६२/– | ३० दिवस |

कामाची सविस्तर सुचना निविदा संबंधी सविस्तर अटी व शर्ती वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकर कागल यांचे कार्यालयीन नोटिस बोर्डवर उपलब्ध राहतील.

| | |
|---|---|
| निविदा भरणेचा कालावधी | दिनांक २३/०१/२०२० ते ३१/०१/२०२० |
| निविदा उघडणेचा कालावधी | दिनांक ०१/०२/२०२० (सोईनुसार) |

जिमाका / को/जाहि/का–४/१९८/२०१९–२०२०

**(एस. वाय. वाघवडे)**
**वनक्षेत्रपाल**
**वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण**
**कागल**

पान १ वरुन

## उद्धव ठाकरे यांचा भाजपला टोला, 'म्हणून मी

मी डरणारा नाही तर मी लढणारा आहे, हे लक्षात असूद्या. मी वेगळा मार्ग स्वीकारला कारण, मला खोटे पाडण्याचा प्रयत्न झाला. तेव्हाच्या मित्रपक्षाने मला म्हणजे उद्धव बाळासाहेब ठाकरेला फसवण्याचा प्रयत्न झाला. २०१४ मध्ये तुम्ही अदृश्य हातांच्या मदतीने सरकार स्थापन केली. मी जी जबाबदारी स्वीकारली होती ती माझ्या स्वप्नातही नव्हती. आम्ही भगवा खाली ठेवलेला नाही, आमचे अंतरंग भगवेच आहे, असे उद्धव यावेळी म्हणालेत.

## महाराष्ट्राच्या अथर्व लोहार आणि देवेश भईया

जळगाव येथील गणितज्ज्ञ देवेश भईया या १३ वर्षाच्या बालकाने गणितात सृजनात्मक योगदान दिले आहे. मुंबई सायंस टिचर्स असोशिएशनच्यावतीने आयोजित होमी भाभा ज्युनियर सायंटिस्ट परिक्षेत देवेशने सुवर्ण पदक पटकाविले आहे. साऊथइस्ट एशियन मॅथेमॅटीकल ऑल्म्पीयाडमधे सादर केलेल्या शोध प्रबंधासाठी देवेशला सुवर्ण पदक मिळाले आहे. इग्नायटेड माइंडलॅब परीक्षेत सर्वात जास्त गुण मिळविणारा देवेश हा पहिला भारतीय ठरला आहे.

# सरकारी नोकरीच्या पदोन्नतीत पुन्हा आरक्षण?

**मुंबई (प्रतिनिधी) सरकारी नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय कर्मचारी, अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याची प्रक्रिया ठप्प असल्याचा मुद्दा राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी बुधवारी (२२ जानेवारी) उपस्थित केला. त्यामुळे मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत पुन्हा चर्चेला सुरुवात झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून राज्यात शासकीय–निमशासकीय सेवेतील मागासवर्गीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी पदोन्नतीत आरक्षण लागू करण्यात येण्याचे संकेत मिळत आहेत. याबाबत येत्या आठवड्याभरात मुख्य सचिवांच्या स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्याचं मंत्रिमंडळ बैठकीत ठरवण्यात आलं.**

राज्यात २००४ मध्ये अनुसूचित जाती–जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेत सरळसेवेने नोकरभरतीत ५२ टक्के आणि पदोन्नतीत ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा कायदा करण्यात आला. त्यानुसार पदोन्नतीतील आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र परिपत्रक काढण्यात आलं. मात्र त्याला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. न्यायालयाने नोकरभरतीतील आरक्षण मान्य केलं, परंतु पदोन्नतीतील आरक्षण रद्द ठरवलं. राज्य सरकारने उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. अशाचप्रकारच्या अनेक राज्यांच्या याचिका न्यायालयात दाखल आहेत.

दरम्यान, एका प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीमधील आरक्षण मान्य केलं आहे, त्याचा आधार घेऊन पदोन्नतीत आरक्षण लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घ्यावा, असं पत्र केंद्र सरकारने पाठवलं होतं.

मात्र आपल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय जो निर्णय देईल, त्याचीच अंमलबजावणी करण्याची भूमिका महाराष्ट्र सरकारने घेतली. त्यामुळे गेली अनेक वर्षे पदोन्नतीचा प्रश्न प्रलंबित राहिला आहे. मात्र पदोन्नतीमधील आरक्षण थांबल्यामुळे त्याचा मागासवर्गीय कर्मचारी, अधिकाऱ्यांना मोठा फटका बसला आहे. त्याचा प्रशासनाच्या कामकाजावरही परिणाम होत असल्याने पदोन्नतीत आरक्षण लागू करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिज्ञापत्र राज्य सरकारने २०१९ सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलं आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयात अद्याप त्यावर सुनावणी झालेली नाही, अशी माहिती सामान्य प्रशासन विभागाने दिली आहे.

तत्पूर्वी पदोन्नतीतील आरक्षणाबाबत राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात अनुकूल भूमिका घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नतीत आरक्षण लागू करण्याबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी केंद्राने राज्यावर सोपवली आहे. त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे, असा नितीन राऊत, सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे, शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी बैठकीत मांडला. त्यावर राज्याचे मुख्य सचिव अजॉय मेहता याबाबत आठवड्याभरात बैठक घेऊन न्यायालयात प्रलंबित असलेली याचिका, कायदेशीर बाबीचा अभ्यास करतील आणि योग्य निर्णय घेण्यात येईल, असे मंत्रीमंडळ बैठकीत ठरवण्यात आलं.

'वारणेचा वाघ' हे साप्ताहिक मालक मे. वारणेचा वाघ (भागीदारी संस्था) यांजसाठी मुद्रक व प्रकाशक प्रविण पांडुरंग पाटील यांनी शिव इंप्रेशन, २८२३/६, महालक्ष्मी नगर, सुभाष रोड, कोल्हापूर येथे छापून मु. पो. कोडोली, ता. पन्हाळा जि. कोल्हापूर ४१६११४ येथे प्रसिद्ध केले संपादक-प्रविण पांडुरंग पाटील 'Waranecha Vagha' weekly is owned by M/s. Warnecha Wagh (Partnership Firm), Printed & Published by Pravin Pandurang Patil, Printed at Shiv Impression, 2823/6, Mahalaxmi Nagar, Subhash Road, Kolhapur & Published at A/p. Kodoli, Tal. Panhala, Dist, Kolhapur - 416 114 Editor -Pravin Pandurang Patil. मुख्य कार्यालय: कोडोली (वारणा),ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर ४१६११४ (महाराष्ट्र), दूरध्वनी(०२३२८)२२३३३९.मोबा.-९८२२८४००३९.email-warnechawagh@gmail.com, web-www.warnechawagh.com सर्व कायदेशीर बाबी कोल्हापूर न्यायालयाच्या कक्षेत. या अंकातील प्रसिध्दी झालेल्या सर्व मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.